Estd: 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28TH Rank

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.–416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी2690571, 2693643, 2693730
परीक्षा नियत्रंक कार्यालय दूरध्वनीः 2693176, फॅक्सः 0231&2690655
इतर परीक्षा–2 विभाग विस्तारित दूरध्वनी 2609120 FAX: 0091-0231-2691533 & 0091-0231-269233

**Ref.:No. /SU/O.E. 2/3/EXAM/811** **Date : 05-05-2017**

# अत्यंत महत्वाचे परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य,/अधिविभागप्रमुख/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/केंद्रे
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

विषय – मार्च /एप्रिल, 2017च्या परीक्षांचे अंतर्गत/सत्रकर्मचे गुर्ण ऑनलाईन प्रणालीत भरणेबाबत.

महोदय/महोदया,

मार्च/एप्रिल, 2017 या सत्राधील परीक्षा सध्या सर्व महाविद्यालयांत/ अधिविभागात/तसेच दूरशिक्षण केंद्रावर सुरू आहेत. सदर परीक्षांसाठी नियमित व बहिःस्थ असे अनेक विद्यार्थी परीक्षा देत आहेत. सदर विद्यार्थ्यांचे अंतर्गत/सत्रकर्मचे गुण ऑनलाईन भरून घेण्याची प्रकीया सध्या सुरू आहे. सदर नियमित विद्यार्थ्यांची अंतर्गत/सत्रकर्मच्या गुणांची यादी इतर परीक्षा 2 विभागात जमा करावी. तसेच बहिःस्थ विद्यार्थ्यांच्या अंतर्गत गुणांची यादी दूरशिक्षण केंद्रात जमा करावी.

तथापि, ऑनलाईन व्यवस्थेत अद्यापही कित्येक महाविद्यालयांनी/ केंद्रांनी/ अधिविभागांनी विद्यार्थ्यांचे अंतर्गत/सत्रकर्मचे गुण ऑनलाईन भरलेले दिसून येत नाही. तसेच काहींनी अजून अंतर्गत गुणांची यादी संबंधित विभागात अद्यापही जमा केलेल्या नाहीत. अंतर्गत/सत्रकर्म गुण ऑनलाईन भरण्याची व्यवस्था बंद केल्यानंतर जर विद्यार्थ्यांचे गुण भरले किंवा तसेच उशीर भरले, तर ते ऑनलाईन व्यवस्थेमध्ये येत नाहीत आणि त्यांची प्रिंट मध्ये नोंदही येत नाही. तेंव्हा सदर तकारी विद्यार्थी निकालानंतर महाविद्यालयात तद्नंतर या तकारी विद्यापीठात घेवून येतात. तेंव्हा ऑनालईन व्यवस्था सुरू असतानाच सदर गुण ऑनलाईन पध्दतीने भरून सदर प्रिंट तपासूनच संबंधित विभागात जमा कराव्यात.

सदर परीक्षा संपल्यावर मात्र अंतर्गत/सत्रकर्मचे गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. ऑनलाईन पध्दतीने भरण्याच्या संदर्भात कोणतीही तकार असेल तर तात्काळ आयटी सेल/डियुडीसी विभागाशी संपर्क साधून किंवा प्रत्यक्ष परीक्षा विभागात येवून गुण भरून, सदर अंतर्गत गुणांची यादी जमा करावी. तसेच उशीरा किंवा निकालानंतर कोणत्याही परिस्थितीत अंतर्गत गुण भरता येत नाहीत किंवा संगणक प्रणाली बंद केल्या नंतर गुण भरताना तांत्रिक समस्या निर्माण होतात. त्यामुळे होणा–या निकालास विलंब लागतो, तसेच सदर विद्यार्थ्यांच्या होणा–या तकारीस किंवा येणा–या समस्येस संबंधित केंद्र/अधिविभाग/महाविद्यालये जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

तरी महाविद्यालयांनी/ केंद्रांनी/ अधिविभागांनी अंतर्गत गुण ऑनलाईन व्यवस्थेमध्ये दि.10.05.2017 पूर्वी भरावेत व सदर याद्या दि. 15.05.2017 पर्यंत संबधित विभागात तात्काळ जमा कराव्यात.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/–
उपकुलसचिव